आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ३०४ वा ● शनिवार दि. १० मे २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका चार महिण्याच्या आत, बाहेर घ्या असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला असला तरी, यापूर्वी स्थगती आणी आता निर्देश यामूळे राजकीय पक्षात गदारोळ निर्माण झाल्याचे दिसते आहे. कांहीच कळत नाही, डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, मागील पाच ते तीन वर्षापासून जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगर पालीका, पंचायत समित्या, ग्राम पंचायती या प्रशासकीय कोलदांड्यात अडकलेल्या आहेत, पूर्वी कॉंग्रेस, यूपीए सरकारच्या काळात वार्ड, प्रभाग रचना झाली होती. पण राजकारण, सत्ताकारण, बरोबर मतदाराची वाढ, वगैरे झाल्याने न्याय संस्थेच्या निर्देशानुसार निवडणूका होऊच शकत नाहीत, त्यामूळे राज्य सरकारनेच मूदत वाढ मागीतली आहे, मग तू कशाला काळजी करतो आहेस, हेच कळत नाही.

एक – अहो, तूमचं डोकं सरकलं आहे काय ? सत्ताकारणाचा आत्मा असतो, आमदार, मंत्री खासदार हे कोणाच्या जीवावरचे ओझे असते हेच तूम्हाला कळत नसेल तर शहाणपणा कशाला मिरविता. गोधडी पांघरुण घरात बसा समजलं.

दुसरा – अरे, तू असा कसा माझ्यावर खवळला आहेस हेच कळत नाही, काय घडले हे तर सांगशील ना ?

एक – अहो, माझी वस्ती राखीव आहे, म्हणून काबाडकष्ट करुन त्याना नगरसेवक केलो. त्यांना आमदारकीसाठी भरभरुन मतदान केले, ते मंत्री झाले, आणि हे नगरसेवक महापौर झाले अन् आता हाच प्रभाग, वार्ड खूला करु पाहात आहेत मग मी काय करु म्हणूनच ओरडतो आहे.

दुसरा – अरे, रे तूझी गत ही, माझ्यासारखीच झाली पण वेळ गेली नाही, पूढे चालत राहा, सारे कांही सूरळीत होईल, तेच होत्याचे नव्हते होतील, आणी तूम्ही आम्ही आनंदाने जगू, निवडणूकाचे मनावर घेवू नकोस.

## मध्यवर्ती बस स्थानकातून बस सेवा सुरु करण्यासाठी सामान्य प्रवाशांच्या हिताचा निर्णय घेणार - जिल्हाधिकारी वर्षा घुगे

लातूर–मध्यवर्ती बस स्थानकातून औसा–सोलापूर तुळजापूर कोल्हापूर, बार्शी–पुणे–मुंबई, धाराशिव, कळंब बस सेवा पूर्ववत सुरू करावी या प्रमुख मागणीसाठी नागरी हक्क संघर्ष समिती आणि एसटी प्रवासी संघटना लातूर यांनी यापूर्वी विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामार्ग राज्य परिवहन, पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले होते परंतु प्रशासनाने पूर्वीच्या निर्णयात बदल न केल्यामुळे संघर्ष समिती आणि प्रवासी संघटना यांनी लातूर जिल्हाधिकारी वर्षा घुगे ठाकूर यांची शिष्टमंडळाद्वारे भेट घेऊन मध्यवर्ती बस स्थानकातून पूर्ववत बस सेवा सुरू करावी आणि सर्वसामान्य प्रवाशांच्या हिताचा निर्णय घ्यावा तसेच अवैद्य व खाजगी वाहतूक वाहनामुळे झालेली कोंडी कमी करण्याचा प्रयत्न करावा असे आग्रही निवेदन दिले असता लातूर जिल्हाधिकारी यांनी सर्वसामान्य प्रवाशांच्या हिताचा निर्णय घेईन असे आश्र्वासित केले.

**मध्यवर्ती बस स्थानकातून पूर्वत बस सेवा सुरू करा खा. शिवाजी काळगे यांच्या विभाग नियंत्रकास सूचना**

लातूर चे खासदार शिवाजी काळगे यांची






संघर्ष समिती आणि प्रवासी संघटनेने भेट घेतली असता त्यांनी विभाग नियंत्रक आणि जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून मध्यवर्ती बस स्थानकातून पूर्ववत बस सेवा सुरू करण्यासाठी सूचित केले. या शिष्टमंडळात प्रामुख्याने भाई उदय गवारे, सूर्यप्रकाश धूत, बसवंत भरडे,कॉ.विश्र्वंभर भोसले,रामकुमार रायवाडीकर, रघुनाथ बनसोडे,लाला सुरवसे, नवनाथ आल्टे,नागनाथ साळुंखे, प्रा. आनंत लांडगे,ॲड जैनु शेख, तसेच खासदार यांना भेटताना अशोक गोविंदपुरकर, रवी गायकवाड,विनय जाकते, अजय सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

तसेच या निवेदनावर प्रामुख्याने पांडुरंग देडे,दीपक गंगणे, जी ए गायकवाड, गणपतराव तेलंगे,रईस टाके, सतीश कारंडे,शेख मैनूदिन, ,डी उमाकांत,डॉ.बालाजी रणक्षेत्रे,ॲड लक्षण शिंदे,सिद्धार्थ सूर्यवंशी,किसन सूर्यवंशी, शेख अब्दुल्ला, गोरोबा मगर, सुरज पाटील,आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत

## काय बोलता राव ?

पहलगाम हल्ला प्रकरणी दहशतवाद्याचा बिमोड, पाकला प्रत्यूत्तर, पाक लष्कराला जशास तसे उत्तर आणी पाक सरकारला खडे बोल देण्याचे धाडस भारतीय लष्कराच्या बळावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी हम भी कूच्छ कम नाही हे दाखवून दिले. भारतीय राजकारणातील सत्ताधारी, विरोधी पक्षाच्या नेत्यानी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना पाठींबा दिला आहे पण मागच्या आणी कालच्या सर्वपक्षीय बैठकीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हेच गैरहजर राहात असल्याने यातील काय गौडबंगाल आहे, या बाबतच पहलगाम हल्ला प्रकरणा ऐवजी मोदी गायब का राहातात, होतात अशीच अधिक कुजबूज होताना दिसते आहे.

**काय बोलता राव !**

अरे, पलहगाम हल्ला प्रकरण, पाक सैन्याचा घूसखोरी, दहशतवादी हल्ले, त्यात पाकसरकारचा हात, या सर्व बाबी उघड झाल्याने पाकची जिरवावीच या हेतूने सर्वपक्षीय नेत्यानी मोदीजीना पाठींबा दिला पण पाक विरोधी लढ्याचे श्रेय सर्वपक्षीयाना जावू नये, केवळ आरएसएस, भाजपा सोडून फक्त नरेंद्र मोदी पहलगाम, पाक प्रकरणी गैरहजर राहात असतील त्यात काय नवल आहे. ती मोदीजीची जूनीच स्वंय आहे, मग बोला दाजीबा !

## मनपाच्या आरोग्य शिबिराचा नागरिकांनी घेतला लाभ

### विविध वॉर्ड मधे १४ आरोग्य शिबिरांचे आयोजन , ८६७ नागरिकांची तपासणी

लातूर /प्रतिनिधी : आरोग्य विभाग,लातूर शहर महानगरपालिका लातूर यांच्यावतीने शहरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने नियोजन आयुक्त देविदास जाधव व उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या वतीने केले जात आहे. त्यानुसार उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून प्रत्येक दवाखाना अंतर्गत दर महिन्याच्या २९ व ३० तारखेला सार्वजनिक ठिकाणी/वॉर्ड मधे आरोग्य शिबिर घेण्यास सुरुवात झाली आहे . परंतु , मागील महिन्यात काही शिबिर झाली नसल्याने, दि.०९/०५/२०२५ रोजी एकूण १४ ठिकाणी आरोग्य शिबीर घेण्यात आले व त्यात तब्बल ८६७ रुग्णांची तपासणी करण्यात आले .



मनपा आरोग्य विभागा अंतर्गत कार्यान्वित असलेले एकूण ३२ आरोग्य केंद्र येथे दैनंदिन आरोग्य सेवा सुविधा नागरिकांना मनपा देत असते.. परंतु शासकीय योजना व आरोग्य सुविधा अधिकाधिक नागरिकान पर्यंत पोचवण्याचा दृष्टीने संबंधित दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात दरमहा शिबिर घेऊन किमान १०० रुग्णांची तपासणी करण्याचे निर्देश उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी विभागास दिले आहेत.

त्यानुसार आरोग्य विभागाने प्रत्यक्ष वॉर्ड मधे कॅंप घेऊन यावेळी एकूण १४ आरोग्य केंद्र मार्फत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते दि. ०९/०५/२०२५ रोजी आरोग्य शिबिरामध्ये एकूण ८६७ रुग्णाची वैद्यकीय तपासणी करून मोफत औषध उपचार करण्यात आले.या सर्व रुग्णांना या शिबिराचा लाभ झाला असून रक्तदाब, मधुमेह रुग्णचे निदान व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे .या शिबिरास मनपा उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांनी भेटी देऊन आढावा घेतला.

सदरील आरोग्य शिबिर एप्रिल महिन्यापासून दरमहा २९ व ३० तारखेला नियमित पणे शहराच्या वेगवेगळ्या भागात होणार असल्याने मनपाच्या आरोग्य सेवा अधिकाधिक नागरीकापर्यंत पोचवता येतील व या आरोग्य शिबिराचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान मनपा मार्फत करण्यात आले आहे.

## बांबू लागवडीसाठी यंत्रणांनी टार्गेट घेऊन काम करावे: पाशा पटेल

पुणे : पुणे जिल्ह्यातील भोर आणि वेल्हा तालुक्यात बांबू लागवड लोकप्रिय असली तरी मोठी संधी असूनही उर्वरित पुणे जिल्ह्यात बांबू लागवड झालेली नाही, या पुढील काळात क्षेत्रिय स्तरावर कर्मचाऱ्यांना व्यक्तीशा टार्गेट देऊन पुणे जिल्ह्यात मराग्रारोहयो अंतर्गत बांबू लागवडीचे ध्येय निश्र्चित करण्याचे पुणे जिल्ह्यातील यंत्रणांनी ठरवले असून त्या कामी मुख्यमंत्री पर्यावरण संतुलित कृती दलाचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांचे सहकार्य घेण्याचे निश्र्चित झाले आहे.



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत बांबू लागवड अभियान विषयक आढावा बैठक (ता.९) मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्र्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या महत्त्वाच्या बैठकीला उपजिल्हाधिकारी रोहयो डॉ. चारुशीला देशमुख–मोहीते, डॉ. कृपाण घोष, प्रमुख, अॅंग्रीमेट विभाग,के.सी.साई कृष्णन, प्रमुख, IMD पुणे,डॉ.ओ.पी श्रिजीत, शास्त्रज्ञ IMD, डॉ. एस.डी. सानप, D emòk IMD आरती बंडकर, शास्त्रज्ञ IMD, नवनाथ अवताडे,उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.निः मंडळ पुणे, आर. वाय. पाटील,कार्यकारी अभियंता, सा. ,बा.पुणे आणि सं. स. विश्र्वासराव, उपसंचालक,जि. अ.कृ.अ. पुणे या महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. चारुशीला देशमुख–मोहीते म्हणाल्या, २०२४–२५ साठी ३०० हेक्टर उद्दिष्ट देण्यात आले होते. २०२५–२६ साठी ४५० हेक्टर उद्दिष्ट देण्यात आले. एकूण पाच वर्षातील ३००० हेक्टर उद्दिष्ट पैकी २०२४–२५ मध्ये १३३.६ हेक्टर इतकी लागवड झाल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी बोलताना पाशा पटेल म्हणाले.पुणे जिल्ह्यामध्ये क्षमता असूनही बांबू लागवडी मध्ये दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.वातावरण बदलाचे संकट दिवसेंदिवस वाढत आहे.इस्त्रायलमधील तेल अविव आणि अमेरीकेत कैलिफोर्निया आग लागली.

२०२४ हे सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले असून दिल्ली तापमान ५२.९ डिग्री परंतु गेल्याचे प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले होते.४७ डिग्री तापमानामध्ये माणुस मरतोय. दुबई होरपळतेयं तिथे तापमान ६५ डिग्री पर्यंत पोहोचले आहे. एकंदरीतच वातावरण बदलाच्या संकटामुळे मानवजातीसमोरचे सगळे मार्ग खुंटले आहेत, असे ते म्हणाले. कार्बन इमिशन ( उत्सर्जन) दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगत ते म्हणाले, २०५० पर्यंत समुद्र किनारी असणारे देश आणि शहरे बुडणार आहेत.कोळसा आधारित औष्णीक प्रकल्प बंद करावे लागणार आहेत.

सर्वांनाच आता पर्यावरण पुरक वस्तु वापराव्यात लागणार आहेत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.वेगाने वाढणारा बांबु एकमेव गवत वर्गीय वृक्ष असून बांबू बहु उपयोगी ठरत आहे.

यावेळी बोलताना भारतीय हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस.डी. सानप म्हणाले, ’औद्योगिक विकासाने कार्बन उत्सर्जन वाढले आहे. पारंपारिक उर्जा स्त्रोत वापराने कार्बन इमिशन वाढले. त्यामुळे वातावरण बदल होऊन कृषी क्षेत्राला वातावरण बदलाचा मोठा फटका बसत आहे.

तापमानातील वाढ, कमी कालावधीत जास्त पाऊस, ढगफुटी, वादळे घटक शेती बरोबरच आरोग्य वनक्षेत्र आणि जलसंधारण या विभागांना प्रभावित करत असल्याचे कडे त्यांनी लक्ष वेधले.पुणे जिल्ह्याचा विचार करता फक्त भोर आणि बिल्हा तालुक्यांमध्ये पारंपारिक रित्या बांबूच्या गोड होत आहे परंतु क्षमता असू नये शिरूर सह आंबेगाव आणि जिल्ह्यातील अनेक भागात ज्या ठिकाणी सिंचनातून जमिनी नापीक झाल्या अशा भागात देखील बांबू लागवडीसाठी मोठी संधी असल्याचे पाशा पटेल यांनी सांगितले. प्रत्येक यंत्रणेमध्ये क्षेत्रीय पातळीवरील कर्मचाऱ्यांना टार्गेट देऊनच यापुढील काळात बांबू लागवडीचे ध्येय गाठले जाईल,असे यावेळी सर्व अधिकाऱ्यांनी एकमताने आश्र्वासित केले.

## पंतप्रधानांनी परमपूज्य पोप लिओ चौदावे (दखत) यांना शुभेच्छा दिल्या

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परम पूज्य पोप लिओ चौदावे (दखत) यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले असून, त्यांना भारतीय जनतेच्या वतीने शुभेच्छा दिल्या आहेत. पोप यांच्या कॅथोलिक चर्चच्या नेतृत्वाची मोदी यांनी प्रशंसा केली असून, जागतिक शांतता, सौहार्द, एकात्मता आणि सेवेचा प्रसार करण्यामधील त्यांच्या नेतृत्वाचे मोलाचे महत्व अधोरेखित केले आहे. ’’पोप लिओ दखत (चौदावे) यांचे मी भारतीय जनतेच्या वतीने मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांना शुभेच्छा देतो. शांतता, सौहार्द, एकात्मता आणि सेवेचा आदर्श पुढे नेण्यासाठी म हत्वाच्या असलेल्या टप्प्यावर ते कॅथलिक चर्चचे नेतृत्व करत आहेत. आमची सामायिक मूल्ये पुढे नेण्यासाठी पवित्र पोप यांच्याशी सातत्याने संवाद आणि संबंध ठेवण्यासाठी भारत वचनबद्ध आहे.




## दिशाभूल करणाऱ्या संदेशांपासून सावध राहण्याचे निवृत्तीवेतनधारकांना आवाहन

मुंबई, : संचालनालय, लेखा व कोषागारे तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व सर्व कोषागार कार्यालये यांच्यामार्फत सर्व निवृत्तीवेतनधारकांना सूचित करण्यात येते की, निवृत्तीवेतन सुरू करणे, निवृत्तीवेतन बंद करणे, निवृत्तीवेतन फरक अदा करणे अथवा अतिरिक्त रक्कम वसुल करण्याच्या अनुषंगाने राज्यातील कोषागार कार्यालयामार्फत फोनद्वारे / मोबाईलद्वारे निवृत्तीवेतनधारकांना कळविले जात नाही. तसेच व्हॉट्स ॲपद्वारे अथवा इतर सोशल मिडियावरून निवृत्तीवेतन बंद होऊ नये, याकरिता लिंक ओपन करून फॉर्म भरण्याबाबतही कळविले जात नाही.



तसेच कोषागार कार्यालयामार्फत कोणत्याही कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकाच्या घरी पाठविले जात नाही. कोषागारामार्फत करण्यात येणाऱ्या सर्व व्यवहारांकरिता पत्रव्यवहार केला जातो. सर्व निवृत्तीवेतनधारकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी फोन पे / गूगल पे/ ऑनलाईन रक्कम भरण्याच्या अथवा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदेशास बळी पडू नये. अशा प्रकारे दूरध्वनीद्वारे / मोबाईलद्वारे संदेश प्राप्त झाल्यास संबंधित कोषागार कार्यालयाशी तातडीने संपर्क साधावा, असे आवाहन अधिदान व लेखा अधिकारी/ कोषागार अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांना पुण्यतिथीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अभिवादन

सातारा : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६६ व्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या प्रांगणात समाधीस्थळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिवादन केले.



यावेळी मदत व पुनवर्सन मंत्री मकरंद पाटील, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि खासदार शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार सर्वश्री शशिकांत शिंदे, दिलीप वळसे पाटील, रोहित पवार, चेतन तुपे, बाबासाहेब देशमुख, आशितोष काळे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, माजी आमदार सुनील भुसारा, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संघटक अनिल पाटील, उपाध्यक्ष अरुण कडू पाटील, ॲङ राम काणगे आदी मान्यवर उपस्थित होते.

अभिवादनानंतर रयत शिक्षण संस्थेच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते कर्मवीर पारितोषिक विजेत्या शाखा, यशवंतराव चव्हाण आर्दश शिक्षक पुरस्कार विजेते, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू व आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यामध्ये कर्मवीर पारितोषिक विजेत्या पुढील शाखांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# मोदीजी निर्भयपणे चला ...!

संपादकीय...

पळकूटा निरव मोदी किंवा इतर कोणते ही मोदी नावाचे मोदी असोत, नसोत पण भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणून आम्हा पत्रकारासह भारतीयाना स्वाभिमान वाटतो आहे, कारण आजवर जे कांही केले त्यापेक्षा आजघडीला पाक सरकार, पाक लष्कर आणी पाकी प्रशासनाला जो कांही ऐनवेळी धडाका दिला, देत आहोत यापूढे ही देणे गरजेचे असल्यानेच तमाम भारतीय जनता निर्भयपणे पूढे चला, शत्रूशी लढा, दुःश्मनाला त्यांची जागा दाखवून द्या असे म्हणून सर्वपक्षीय जनता, नेते, पत्रकार हे आपल्या अर्थात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी आहेत हे विसरता कामा नये अशीच राजकीय वर्तूळात प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे.

भारत हा शांतताप्रिय देश आहे, भारताची भारतीय राज्यघटना सामाजीक न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधूभाव, न्याय व हक्कासह धर्मनिरपेक्षता, पूरोगामी विचाराची कटीबध्द लिखित प्रेरणा देते यावरच स्वतंत्र भारताचा कारभार चलू आहे, यात संदेह नाही. परंतू आजवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळावरच पडदा पडत असून नव्यानेच प्रधानमंत्री मोदीनी सम्यक विचाराने प्रेरीत होवून पाकीस्तान सरकार, लष्कर आणी तेथील जनतेला न्याय, हक्क व स्वाभिमानाचा धडा देत आहे या संदर्भात मोदीजीचे कौतूक होताना दिसते आहे. ते ही थोडके नसावे.

जगभरातील कोणतेही राष्ट्र भारताकडे वाकड्या नजरेने पाहू शकत नाही एवढी भारताची ताकद आहे. परंतू भारतीय अंतर्गत कलहामूळे भारत चर्चेत राहीला आणी तोच धागा पडकून पाकने भारताला विकलांग करण्याचा प्रयत्न केला. हे वास्तव असले तरी राजकीय नेते, सत्ताधारी प्रतिनिधी यापेक्षा भारतीय तिनही दलाचे लष्कर, सैनिक हे भारतीय नागरीकाच्या रक्षणासाठी, देशाला अखंड ठेवणे आणी सार्वभौम, लोकशाही, धर्मनिरपेक्षता टीकविण्यासाठी सज्ज आहेत हेच मान्य करुन मोदीजी निर्भयपणे पाकविरोधात पूढे चला अशी आर्तहाक सर्वसामान्य जनता करीत असेल तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याखेरीज दुसरा कोणी भाग्यवान ठरुच शकत नाही असा बोलबाला होताना दिसतो आहे तो सहजासहजी नाकारता येण्यासारखा नसावा असे वाटते.

पहलगाम हल्ला करुन पाकडे, पाक लष्कराने, पाकी दहशतवाद्याने भारताला आव्हाण दिले. अचानक उद्भवलेल्या परिस्थितीला लष्करी जवानानी सडेतोड उत्तर दिले. केंद्र सरकार अर्थात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जागृत, जागे झाले. मन की बात, सोडून भारतीय नागरीक, लोकप्रतिनिधी आणी एक शासक म्हणून मोदीजी खवळले आणी सिंदूर योजना राबविली, राबवित आहेत असे अवचितपणे मोदीजी हातून घडत असल्याने कोणता राष्ट्रीय स्वंयसेवक संघ आणी कोणता भाजपा राजकीय पक्ष वगैरे बाजूला ठेवून नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान आहेत म्हणूनच ही ती ओळख ठरवून सर्वच राजकीय पक्षानी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना पाठींबा जाहिर करुन पाकच्या चिंधड्या करा असे प्रोत्साहीत केले ही कांही अन्यन्यसाधारण बाब नसावी असे वाटते.

यूध्दानी वाढते यूध्द, प्रेमाने जिंकता येते यूध्द ही बुध्दप्रणाली अंगिकारुन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी दहशतवादाचा दमनदिन अधोरेखीत करुन शत्रूच्या कोंडाळ्यात शांततेत राहायचे तर यूध्दासाठीही तत्पर राहायचे या तत्वाशी प्रामाणीक राहून केवळ दहशतवादीशी लढा देणे अनिवार्य ठरते हेच साध्य, साधन, सिध्दांत समजून पाकविरोधी नव्हे तर पाकी दहशतवादी समूहा विरोधात तिन्ही लष्करी दलाच्या सहकार्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लढत आहेत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहाणे गरजेचेच वाटते म्हणूनच प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी निर्भयपणे पूढे चला पण पाकला चिरडायचे असेल तर इंदिरा गांधी यांची तत्वप्रणाली स्विकारा अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते एवढेच.

## उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती असते?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## लातूरकरांसाठी 'आदिवासी संगीत यात्रा'

लातूर :- भारतीय आदिवासी वा लोकसंगीताचे दर्शन घडवण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेने भारतीय संगीत क्षेत्रातील शिक्षिका, संशोधक व गायक प्राची माया गजानन यांना आमंत्रित केले आहे.

प्राची ह्या भारताच्या मूळ संगीत परंपरेच्या वारशाचे जतन आणि प्रचार करण्याचे कार्य करत आहेत. त्या भारताच्या दुर्गम भागांत जाऊन आदिवासी संगीताचे संकलन करून त्यांची महती उलगडून दाखवत आहेत. त्यांचे आदिवासी संगीत विचार' हे पुस्तक सिमला येथील 'इंडियन इंस्टीट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज' यांनी प्रकाशित केले असून ते भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मूजींना भेट दिले आहे. ह्या पुस्तकाचे भारतातील आदिवासी, सांगीतिक

आणि शैक्षणिक वर्तुळात उत्साहाने स्वागत केले जात आहे. प्राची यांनी संपूर्ण भारतात व परदेशात अनेक संगीत मैफिली सादर केल्या आहेत आणि त्यांच्या नावावर अनेक

सीडीज व अल्बम्स आहेत. त्यांना सर सी. व्ही. रमन पुरस्कार, कलेश्र्वरी सन्मान, आयबीएन- लोकमत प्रेरणा पुरस्कार, म्युझिक फोरम पुरस्कार ह्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तसेच त्यांना 'इंडियन इंस्टीट्यूट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज' 'टाटा फेलोशिप इन फोल्कलोर' आणि भारत सरकारकडून 'सांस्कृतिक फेलोशिप' प्राप्त झाल्या आहेत.

विदुषी प्राची माया गजानन ह्या आदिवासी संगीताची निर्मिती होतानाच्या कथा आणि गीते यांतून 'आदिवासी संगीत यात्रा' घडवणार आहेत.

रविवार, दि. ११ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या

कस्तूर-कंचन सभागृह येथे होत असलेल्या अशा वैशिष्ट्यपूर्ण मैफिलीचा लाभ रसिकांनी घ्यावा असे आवाहन स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्या वतीने करण्यात आले आहे.

# जनामनातून प्रगटीत व्हावे ही बुध्दाची निती!

'बुध्दाचं तत्वज्ञान म्हणजे शंतपण पण ठामपणे पण अन्यायाला विरोध करणं आणि समानतेसाठी लढणं. बुध्दमुर्ती केवळ धार्मिक नाही तर ती सामाजिक न्याय आणि समानतेची प्रेरणा आहे'.

आज समाजाचे एकंदर चित्र पाहिल्यावर असे दिसते की, समाज हा गरीबी, अज्ञान, अंधश्रध्दा, भ्रष्टाचार, पिळवणूक, लोभ, अनैतिकता यांनी ग्रासित झाला आहे. अशा अशुध्द मानव निर्मित वातावरणात व्यक्तीचा विकास साधणे अशक्यप्राय गोष्ट आहे. मग अशा समाजाचा विकास कितीही साधण्याचा प्रयत्न केला तरी विकास साधता येत नाही. कारण त्या ठिकाणी व्यक्तीच्या विकासाची काहीही तरतूद नाही, म्हणून असा समाज अविकसित असतो. व्यक्ती विकासाला पूर्णपणे स्वातंत्र्य देवून समाज हा विकसित व सुसंस्कृत बनविण्याचा मार्ग म्हणजे भगवान बुध्दांनी सांगितलेला आर्य अष्टांगिक मार्ग आहे. सम्यकदृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्मान्त, सम्यक आजिविका, सम्यक व्यायत, सम्यक स्मृति व सम्यक समाधी या अंगानी परिपूर्ण असलेल्या मार्गाला भगवान बुध्द आर्य मार्ग संबोधतात. अष्टांगिक मार्गाला संपूर्ण तत्वज्ञानाचा गाभा मानल्या जातो. त्यामुळेच व्यक्तीचा सर्वांगिण विकास उपरोक्त मार्गानुसार आचरण केल्यास निब्बाण प्राप्त करता येते.

भोग आणि क्लेश ही जीवनाची आत्यंतिक दोन टोके टाळून यामधला सुलभ, सरळ ज्ञानाचा सन्मार्ग म्हणजे तथागतांचा मध्यममार्ग होय. या मध्यममार्गाचा तथागतांनी केलेल्या शिकवणीचा उपदेश म्हणजे धम्म. सर्वप्रथम वैशाख पौर्णिमेचे महत्व समजावून घेणे आवश्यक आहे, कारण या दिवशी सिध्दार्थ गौतमाचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण या तीनही घटना वैशाख पौर्णिमेच्याच दिवशी घडतात ही काही साधारण बाब नाही, हा चमत्कार ही नाही. याला एक आगळं-वेगळं महत्व आहे, ही वस्तुस्थिती आहे, हे सत्य कोणीही नाकारु शकत नाही. ज्यांचा आज आपण जन्मोत्सव साजरा करीत आहोत, अशा स्थितप्रज्ञ महामानवास त्रिवार वंदन.

विश्र्वबंधुत्व, समानता व मानवी स्वातंत्र्य, एकमेकांविषयी प्रेम भावना, करुणेची भावना इत्यादि मानवाच्या कल्याणासाठी हितकारक गुणतत्वे जोपासणाऱ्या विज्ञाननिष्ठ, तर्कशुध्द, निर्भेड व विशुध्द जीवन मार्गावर आधारित अलौकिक अशा पवित्र धम्माची स्थापना करणारे जगातील पहिले क्रांतिकारी



महामानव म्हणजेच तथागत भगवान गौतम बुध्द होत. सिध्दार्थ गौतमाने रोहिणी नदीच्या वादातून गृहत्याग केला व परिव्रजा घेतली. कपिलवस्तुहून राजगृहास आले असता मगधधिपती राजा बिंबीसार यांनी त्याची भेट घेतली. राजा बिंबीसार यांनी सिध्दार्थ गौतमास ऐहीक सुखोपभोगाबाबत उपदेश केला आपण पुन्हा कपिलवस्तुत परतुन राज्योपभोग घ्यावा, तेथे जाणे उचित वाटत नसल्यास मी माझे अर्धे राज्य आपणांस देतो तेथे आपण राज्य करावे अशी विनंती केली, परंतू संन्यासाचा जीवन मार्ग अवलंबू नये.

तद्प्रसंगी सिध्दार्थाने राजा बिंबीसारला विचारपुर्वक गांभीर्याने खणखणीत उत्तर दिले सुख म्हणजे उपभोग, असे सर्वसाधारण मानले जाते. कसोटीला लागल्यास त्यापैकी एकही उपभोगण्याच्या योग्यतेचे आहे असे आढळत नाही. तहान भागविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते, तसेच भुक शमविण्यासाठी अन्न हवे असते आपली नग्नता झाकण्यासाठी व थंडी वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी कपडयांची आवश्यकता असते, झोपेची गुंगी घालविण्यासाठी बिछाना असतो, प्रवासाचा शीण होवू नये म्हणून वाहन असते उभे राहण्याचा त्रास कमी करण्यासाठी आसन असते. तसेच शरीराची शुध्दी, आरोग्य यासाठी स्नान एक साधन असते. फक्त बाहय वस्तु म्हणजेच मानवाच्या दु:ख निवारण्याची साधने नव्हती. म्हणून अन्न- वस्त्र-निवारा इत्यादी मुलभुत गरजांना प्राधान्य न देता मानवी कल्याणाचा सुखाचा शोध घेण्यासाठी ज्ञान अर्थात शिक्षण महत्वाचे असते. मिळविलेल्या ज्ञान चिंतनातून मानवाच्या कल्याणासाठी खास जीवनमार्ग शोधला ज्ञानाने व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडविण्यास मदत होते, हा संदेश संपुर्ण विश्र्वाला तथागताने दिला.

व्यक्ति विकासासाठी मानवास शिक्षणाचे-ज्ञानाचे महत्व किती आहे, हे आपल्या देशातील अनेक महामानवाने जाणले. मानवाचे कल्याण त्याचे सुख कशात आहे. याचा शोध घेता महामानवांना आढळले की, प्रथम प्रत्येक व्यक्ति ही शिक्षित- ज्ञानी झाली पाहिजेत. शिक्षणज्ञान मानवाच्या कल्याणाचे, सुखाचे प्रमुख अंग आहे. त्याचा विकासत राजमार्ग आहे, हा राजमार्ग सर्वप्रथम जगाला दाखविला महाकारुणिक गौतम बुध्दाने. भगवान बुध्दांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू आहेत. त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास विविध अंगानी व विविध दृष्टीकोणातून होणे आज आवश्यक आहे. तथागत बुध्दाच्या व्यक्तीमत्वामध्ये ज्याप्रमाणे चुंबकीय तत्व होते, त्याचप्रमाणे त्यांचे तत्वज्ञानामध्ये असे चुंबकीय तत्व होते की, ज्यामुळे असंख्य लोक त्यांच्या व्यक्तीमत्वाने प्रभावित झालेले होतेच. परंतू त्याही पेक्षा कितीतरी पटीने त्यांच्या तत्वज्ञानाने, त्यांच्या तत्वज्ञानातील सभ्यतेने प्रभावित होऊन त्यांनी त्याचे अनुयायीत्व स्विकारलेले होते. या संपूर्ण काळात बहुसंख्य जनतेची संपर्क भाषा ही प्राकृतच राहिली. प्राकृत ही लोकभाषा असल्याने तथागत गौतम बुध्दांनी आपले सर्व ज्ञान त्याकाळाची लोकभाषा असलेल्या पालीतूनच दिल्याचे स्पष्टपणे आढळते.

बुध्दाच्या व्यक्तिमत्वाची छाप व त्यांच्या तत्वज्ञानाची पकड इतकी मजबुत आहे की, भारत भुमीच्या या महापुत्राने केवळ भारताचाच नव्हे तर संपुर्ण विश्र्वालाच प्रभावित केलेले आहे. भारताच्या इतिहासामध्ये एवढा प्रतिभा संपन्न, प्रखर बुध्दिवादी, ध्येयवादी व मानवतावादी अजून कधी झालेला नाही. यापुढे देखील होणे नाही ज्याला संपुर्ण जग सन्मानपुर्वक विनम्र होत असते. बुध्द हा अशा स्वयं प्रज्ञेचा माणुस होता की, ज्याने जगाला पहिल्यांदा प्रखर बुध्दिवादाची व ध्येयवादाची शिकवण दिली. भगवान बुध्द म्हणतात, अत्त-दिपो-भव, अत्त- विरहत, अत्त-सरणी अर्थात हे मानव प्राण्यांनो स्वत:चे दिप व्हा, स्वयं प्रकाशित व्हा आणि स्वत:ला शरण जावून स्वत:चच विचरण करा, दुसऱ्या कुणालाही शरण जावू नका, दुसरा कुणीही तुम्हाला शरण जाण्या योग्य नाही तुम्ही स्वत:च स्वत:चे शरणस्थान आहात, यामध्ये जगाच्या सभ्यतेचा व संस्कृतीच्या इतिहासामध्ये भगवान बुध्दाने पहिल्यांदा मनुष्याला परा प्रवृत्ती, दैव, ईश्र्वर, आत्मा परमात्मा संकल्पना पासून मुक्त होण्याचा महामंत्र दिला व तो जोपासून ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे.

धम्म हा जीवनाच्या विविधांगी पैलूंना स्पर्श करणारा असतो. केवळ वैयक्तिक मोक्षप्राप्ती नसुन इतर सर्व मानवाला मोक्षदाता म्हणुन हितकारक व लाभदायी ठरणारा असतो. म्हणूनच सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, नौतिकमूल्ये अशा सर्वच बाबींना स्पर्श करणारा तो मोठा वर्तुळ परिघ ठरतो. बुध्द आणि कार्ल मार्क्स'' या विषयी काठमांडू येथील विवेचनपूर्ण भाषणात त्यांनी समाजाला पर्यायाने प्रत्येक व्यक्तिला धम्माची नितांत गरज असल्याचे सांगीतले. धर्म ही अफुची गोळी आहे, ही कम्युनिस्टांची धारणा फोल ठरविली. जगातील सर्वधर्म सारखेच आहेत ही धारणाही त्यांनी उखडून फेकली. बुध्दाचा धम्म हा आकाशातील अनेक ताऱ्यां पैकी कसा वेगळा आहे, त्याचे तेज कसे वेगळे आणि दैदिप्यमान आहे, हे सत्य जाणून घेण्यासाठी त्यांनी सर्वांना आवाहन केले होते हे विसरता येत नाही. 'जिथं अध्यात्म संपते, तिथं विज्ञान सुरु होते' आणि हेच सत्य तथागतांनी सांगितले.

बुध्दाचे चरित्र आणि चारित्र्य निर्मळ पाण्याच्या प्रवाहासारखे होते. तो करुणेचा महासागर होता, रंजल्या गांजल्यांचा तो कैवारी, सखा, मित्र आणि मार्गदर्शक होता. जगाच्या इतिहासात अशी माणसे अपवादात्मक असतात अशा सम्यक सम्बुध्दाला अनुसरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या पुढे सर्जनशील आदर्श निर्माण केला. बुध्द-बाबासाहेब हे आमच्या सर्वकष मुक्तीचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी आम्हाला सन्मार्ग उपलब्ध करुन दिला आहे, मार्गक्रमण आम्हाला करावयाचे आहे. त्यासाठी स्वयं प्रकाशित होवून आम्ही बुध्द-धम्म व संघ यांच्या प्रती एकनिष्ठ राहून धम्मचक्र प्रवर्तनाची सम्यक क्रांती गतीमान ठेवली पाहीजे. अशा महान तत्ववेत्यास त्यांच्या २५६९ व्या वैशाख पौर्णिमेच्या शुभेच्छा!

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# आधुनिक कृषी तंत्रज्ञान सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा - पालकमंत्री नितेश राणे

सिंधदुर्गनगरी (जिमाका) : कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे. यामुळे शेतकऱ्यांना अनेक प्रकारे मदत झाली आहे. नवीन आणि सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने पिकांचे उत्पादन आणि उत्पादकता वाढत आहे. शिवाय उत्पादन खर्च कमी होण्यास देखील मदत झाली आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतीची प्रक्रिया देखील सोपी आणि कार्यक्षम होत असल्याने आधुनिक कृषी तंत्रज्ञान सर्व सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याचे निर्देश पालकमंत्री नितेश राणे यांनी दिले.



पालकमंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी अनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिक दिवे, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री रावराणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती भाग्यश्री नाईकनवरे आदी उपस्थित होते.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी तयार केलेल्या कृषी विभागाच्या विविध योजनांचे ठउेवश फलकाचे विमोचन पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात झाले. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्रीमती नाईकनवरे यांनी खरीप हंगाम सन २०२५-२६ मध्ये नियोजित योजना व कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

पालकमंत्री म्हणाले की, कमी खर्चात उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. भात शेती किंवा इतर पिक घेताना नवीन प्रयोग करण्यावर भर द्या. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेती तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन द्या. प्रत्येक ग्राम व तालुका स्तरावरील प्रयोगशील तसेच प्रगतशील शेतकऱ्यांची माहिती संकलित करून त्यांची स्वतंत्र बैठक आयोजित करून जिल्ह्यामध्ये नाविन्यपूर्ण योजनांची अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देश दिले. तसेच विभागाने विविध कृषी योजना शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी विविध प्रचार व प्रसिद्धी माध्यमांचा वापर करून कृषी उत्पादनामध्ये शाश्र्वत वाढ करण्याचे नियोजन करावे, शेतकऱ्यांना नवीन नवीन पिके घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे असेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्ह्यात नवीन काय करता येईल यासाठी सर्व कृषि विभागाने आराखडा तयार करावा. आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना वेळेवर दर्जेदार बियाणे व खते उपलब्ध करुन द्यावीत. याबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार येऊ देऊ नये, याची दक्षता कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी. एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. पीक कर्जाचे देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करावे असेही त्यांनी सांगितले.

खरीप हंगाम २०२५ चे नियोजन :-

खरीप हंगामातील भातपिकासाठी ५६२५५ हेक्टर क्षेत्रावर नियोजन

तांदूळ उत्पादकता - ३१०० किलोग्रॅम/ हेक्टर उत्पादनाचे लक्ष

खरीप हंगामातील नाचणी पिकासाठी १२१७ हेक्टर क्षेत्रावर नियोजन

नाचणी पिकासाठी २५०० किलोग्रॅम/हेक्टर उत्पादनाचे लक्ष

भात बियाणे मागणी - ९३५१.८४ क्विंटल आज अखेर पुरवठा - ३१८७ क्विंटल

खते मागणी - १९५५७ मे.टन - आज अखेर उपलब्धता -२६०१ मे.टन

निविष्ठांबाबतच्या गुणवत्ता नियंत्रणाकरीता जिल्हा स्तरावर व प्रत्येक तालुका स्तरावर भरारी पथके स्थापन केलेली आहेत. जिल्हा स्तरावर तालुका स्तरांवर कृषि निविष्ठा तक्रार कक्ष देखील स्थापन करण्यात आलेला आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील हा नवा भारत आहे, पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले जाईल - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

बीड ( जिमाका ) : -पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम भारत करत आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेला हा घुसके मारेंगे वाला भारत आहे.



आमच्या लाडक्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे काम या दहशतवाद्यांनी केलं त्यासाठी ऑपरेशन सिंदूर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आले त्याचे मी स्वागत करतो. पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम आमचे जवान करत आहेत या दरम्यान महाराष्ट्रातील दोन जवान शहीद झाले त्यांना मी आदरांजली वाहतो असे म्हणत, केंद्राच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे महाराष्ट्रात सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी बैठक झाल्याचीदेखील एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

बीडच्या तारकेश्र्वर गड येथे संत नारायण बाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.. यावेळी व्यासपीठावर आमदार सुरेश धस, यांची प्रमुख उपस्थिती होती.. गडाच्या विकासासाठी आवश्यक ती मदत आपण करणार असल्याचा शब्द देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी गडाचे महंत आदिनाथ महाराज यांना दिला..

कार्यक्रमासाठी गडावरील हेलिपॅड वर त्यांचे आगमन झाले त्यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तसेच पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा. वनिता पाटील यांची नियुक्ती

लातूर : श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा. वनिता पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांच्या या नियुक्तीबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी संस्थेचे सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक बस्वराज येरटे, प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती.

प्रा. वनिता सी. पाटील यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात यांच्या घरी झाला. कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पार्श्र्वभूमी नसताना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण लालबहादुर शास्त्री शाळा, उदगीर येथे पूर्ण झाले. त्यानंतर उच्च माध्यमिक आणि पदवीचे शिक्षण त्यांनी शिवाजी महाविद्यालय, उदगीर येथून पूर्ण केले. त्यानंतरचे पदव्युत्तर शिक्षण एम. एस्सी. फिजीक्स डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे घेतले. बि.एड.चे शिक्षण शासकीय महाविद्यालय, परभणी येथे झाले.

तदनंतर १९९१ सालापासून त्या सेवेत कार्यरत आहेत आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात त्या १९९२ साली रुजू झाल्या. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात त्यांनी अनेक समित्यांवर उत्कृष्ट कार्य केले. आहे. भौतिकशास्त्र विषयाच्या विद्यार्थी प्रिय प्राध्यापिका म्हणून त्यांची ओळख सर्वदूर आहे. महाविद्यालयातील अनेक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांनी वेळोवेळी मदत करून योग्य दिशा दाखवली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य विद्यार्थी आज वेगवेगळ्या ठिकाणी मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत आणि आपापली जबाबदारी चोखपणे बजावत आहेत.

व्यक्तिगत आयुष्यात सुद्धा त्या उत्कृष्ठ गृहिणी आणि आई या भूमिका चोख बजावतात. त्याचा विवाह १९९४ साली चंद्रकांत गुरुनाथराव पाटील यांच्याशी झाला. तेही भौतिकशास्त्राचे प्राध्यापक आहेत आणि २०२३ साली कुमारस्वामी महाविद्यालय, औसा येथून पर्यवेक्षक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना ३ अपत्य असून त्यापैकी २ इंजिनीयर आणि एक डॉक्टर आहे.

तांच्या या नियुक्ती बद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर आणि सर्व संचालक, स्टाफ सचिव डॉ. रत्नाकर बेडगे, विज्ञान शाखा समन्वयक तथा भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सिद्राम डोंगरगे, माजी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, स्टाफ सचिव प्रा. रवींद्र सुरवसे, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादर, सर्व शाखा समन्वयक, विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## विलासराव देशमुख फाउंडेशनचे महिला सक्षमीकरणासाठी आणखी एक प्रभावी पाऊल; बाभळगावात १३८ महिलांना शिलाई प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र प्रदान

लातूर प्रतिनिधी: विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे चालवलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप नुकताच झाला. या कार्यक्रमात तब्बल १३८ महिलांनी आपले ३ महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले, ज्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



महिला सक्षमीकरणाच्या दिशेने दृढ पाऊल:

ट्वेंटीवन ग्री लीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विलासराव देशमुख फाउंडेशनने हे प्रशिक्षण केंद्र चालवले. या केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाईचे प्रशिक्षण देण्यात आले. शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या कौशल्यांचे सखोल ज्ञान महिलांना या प्रशिक्षणातून प्राप्त झाले. बाभळगावमधील महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी फाउंडेशनने हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला.

प्रशिक्षणार्थी महिलांचा मोठा प्रतिसाद:

विलासराव देशमुख फाउंडेशनच्या या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्रामध्ये बाभळगावातील १३८ महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. या महिलांना सेजल सूर्यवंशी आणि क्रांती उफाडे या कुशल प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले. ३ महिन्यांच्या कालावधीत या महिलांना शिलाई कामातील सर्व कला आणि विविध प्रकारच्या शिलाईचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या समारंभाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, अविनाश देशमुख, सदस्य गोपाळ थडकर, प्रशिक्षक सेजल सूर्यवंशी आणि क्रांती उफाडे, गजानन बोयणे आणि सर्व प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पाकिस्तानमधील स्ट्रीमिंग सामग्रीबाबत केंद्र सरकारची कडक भूमिका

नवी दिल्ली, : केंद्र सरकारने सर्व ओटीटी प्लॅटफॉर्म्स, मीडिया स्ट्रीमिंग सेवा व डिजिटल इंटरमिजिअरीज (मध्यस्थ) यांना पाकिस्तानमधील वेब सिरीज, चित्रपट, गाणी, पॉडकास्ट आणि इतर स्ट्रीमिंग मीडिया सामग्री तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. ही कार्यवाही राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे व डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम, २०२१ (घ्ऊ ींल्ते, २०२१) च्या तिसऱ्या भागात ओटीटी प्लॅटफॉर्म्ससाठी आचारसंहिता निर्धारित करण्यात आली आहे. या नियमांनुसार कोणतीही सामग्री प्रसारित करण्याआधी तिच्या परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे, विशेषत भारताच्या संप्रभुता आणि एकात्मतेला धक्का लावणारी सामग्री, राज्याच्या सुरक्षेला धोका निर्माण करणारी सामग्री, भारताचे परदेशांशी मैत्रीपूर्ण संबंध बिघडवणारी सामग्री आणि हिंसा भडकवणारी किंवा सार्वजनिक शांतता भंग करणारी सामग्री. तसेच, नियम ३(१)(ब) नुसार, कोणतीही सामग्री जी भारताच्या एकता, संरक्षण, संप्रभुता किंवा परराष्ट्र संबंधांवर परिणाम करते, ती प्लॅटफॉर्मवर ठेऊ नये, यासाठी मध्यस्थांनी स्वत: प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम (जम्मू-काश्मीर) येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्यात अनेक भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला, तर काही जण जखमी झाले. या हल्ल्याचे पाकिस्तानस्थित राज्य आणि गैर-राज्य घटकांशी संबंध असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर, भारतात कार्यरत असलेल्या सर्व ओटीटी व मीडिया स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म्सना सूचना देण्यात आल्या आहेत की, पाकिस्तानातून उद्भवलेली कोणतीही सामग्री ; ती मोफत असो किंवा विकत घेतलेल्या असल्यास ती तात्काळ बंद करावी.

# गुरुलिंग हासूरे यांना न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार - डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर

लातूर - निलंगा तालुका व औसा मतदारसंघातील कासार सिरशी पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या औंढा या गावात दि. २६ एप्रिल रोजी जमावाने केलेल्या मारहाणीत मृत्यू झालेल्या बडूर येथील शिक्षक गुरुलिंग हासूरे यांच्या मारेकऱ्यांना अटक व्हावी यासाठी बडूर येथे ग्रामस्थांनी सुरुवात केलेल्या साखळी उपोषणास गुरुवार दि. ८ एप्रिल रोजी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी भेट देऊन ग्रामस्थांच्या भावना जाणून घेतल्या





बडूर येथे २ मे पासून हासूरे कुटुंबीय व बडूर ग्रामस्थांनी गुरुलिंग हासूरे यांना न्याय मिळावा यासाठी साखळी उपोषण सुरु केले असून गुरुवार दि. ८ एप्रिल रोजी उपोषणाच्या आठव्या दिवशी डॉ. अर्चनाताई पाटील यांनी भेट देऊन बडूर ग्रामस्थांच्या भावना जाणून घेतल्या व उपोषणस्थळावरून मुख्यमंत्री कार्यालय तसेच पोलिस उप महानिरीक्षक नांदेड परिक्षेत्र श्री शहाजी उमाप साहेब यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत त्याना संपूर्ण घटनेची सविस्तर माहिती दिली व यासंबंधी लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करून हासुरे कुटुंबियांना न्याय मिळवून द्यावा यासाठी विनंती केली.यावेळी त्यांनी बडूर ग्रामस्थ व हासूरे कुटुंब यांनी सुरु केलेल्या या लढाईत आपण सोबत असल्याचे सांगत हासूरे कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रकरणतील सर्व आरोपीना अटक व्हावी, हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा, आरोपीना योग्य शिक्षा व्हावी यासाठी निष्णात वकील देण्यात यावा व सीमावर्ती भागातील गावागुंडंची दहशत कमी व्हावी यासाठी आपण मुख्यमंत्री यांची भेट घेऊन ग्रामस्थांच्या भावना देवेंद्रजिपर्यंत पोहोचविणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यानंतर त्यांनी हासूरे यांच्या घरी भेट देऊन कुटुंबियांचे सांत्वन केले.यावेळी कासार सिरसी चे एपीआय प्रवीण राठोड यांची भेट घेऊन तपासात होतं असलेल्या दिरंगाईबाबात विचारणा केली. यावेळी त्यांच्यासोबत किरण उटगे, भीमाशंकर राचटे, सुनिल उटगे, ज्ञानेश्र्वर वाकडे, नाना धुमाळ, मल्लिकार्जुन दानाई, नितीन पाटील, रणजित कोकणे, मयूर गबुरे, विरेश चिंचन्सूरे, संजय गोला, बालाजी बिराजदार यासह गावातील व परिसरातील नागरिक, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## कसा आरसा ..

सगळीकडे घरामध्ये
लावले आम्हीआरसे
दाखवे सदृश्य रूपडे
उत्कृष्ट किंवा निरसे

खोटीस्तुती करायला
आरसे नाही माणसे
हरकून जा अकारण
दिसता टपोरीकणसे

येताजाता कळेसर्वां
आहो रे आपण कसे
प्रतिमे नाही फेरफार
दाखवती आहो जसे

व्यवस्थीत मेक अप
नको होणे उगा हसे
भुललिया बाह्य रंगा
जगत् हे समस्त फसे

पेहरावां अति महत्व
मनावर उमटवा ठसे
जिथल्या वस्तू तिथे
काहीनको आदमासे

जीममध्ये घाम गाळे
रोग नाहीत ते फारसे
नावे कुणी ठेवू नका
बालपणी केले बारसे

कुणी वेडे प्रश्र्न विचारे
तू मनास पाहतो कसे
स्वभाव तपासू घेण्यां
लावलेत कुठे आरसे

## रॅली ..

मेनरोड ब्लॉक सारे
नेत्यांची जाता रॅली
कुणाच्याही तोंडात
सहज येणारं गाली

टाप ना विचारायची
चपराक बसते गाली
सामान्य नागरिकांचे
कुणीचं नाही वाली

जागोजागी दुभाजक
आडव्या धरी ढाली
कामे कुणा तातडीचे
रे राम भरोसे हवाली

एका जागेवर अंधार
दुसरे जागी मशाली
अडवितात इथे तिथे
तरी विचारी खुशाली

पहात राहती हतबुद्ध
जनता बिचारी भोळी
फायदा घेती रयतेचा
भाजून खातात पोळी

सिग्नल सगळे हिरवे
रॅलीना न नियमावली
सुसाट बेफाट अफाट
वाट्टेल तिकडे धावली

जनता तिष्ठत थांबली
कामे सगळी लांबली
किंमत नाही रे वेळेची
ट्रॅफिक कसली तुंबली

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६.**

## १० मे पासून सुरू होणारे ग्रामीण टी १० क्रिकेट सामने स्थगित

लातूर :-- क्रीडा प्रेमीसाठी पर्वणी असलेले ग्रामीण टी १० क्रिकेट सामने १० मे २०२५ पासून सुरु होणार होते मात्र हे सामने स्थगित करण्यात आले असल्याची माहिती आयोजन समितीकडून देण्यात आली आहे.

जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने प्रतीवर्षी ग्रामीण टी १० सामने तालुका व जिल्हा स्तरावर खेळवले जात आहेत. २०२५ मधील सामन्याची तयार लातूर जिल्ह्यातील विविध तालूक्यात मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती मात्र भारताच्या सिमेवर वाढलेल्या तणावामुळे वाढत्या राष्ट्रीय सुरक्षा परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर या वर्षीचे क्रिकेट सामने स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या निर्माण झालेल्या भारत पाकिस्तान युध्दजन्य परिस्थितीत आपल्या सशस्त्र दलाचे, अधिका-यांचे मनोबल वाढवणे व नागरिकांची सुरक्षा सर्वोच्चस्थानी असायला हवी म्हणून ग्रामीण टी १० क्रिकेट सामने स्थगित करण्यात आले आहेत, असे आयोजन समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## इतिहासात आजचा दिवस १० मे २०२५

अंतरराष्ट्रीय

१२९१ – स्कॉटिश सरदारांनी ईंग्लंडचा राजा एडवर्ड पहिला याचे वर्चस्व स्वीकारले.

१५०३ – क्रिस्टोफर कोलंबसने केमन द्वीपसमूहाला भेट दिली व त्यांचे नामकरण ला तोर्तुगा असे केले.

१५३४ – जॉक कार्टियेने न्यू फाउंडलंड भेट दिली.

१७६८ – न्यू ब्रिटोन या नियतकालिकात राजा जॉर्ज तिसऱ्यावर टीका करणारा लेख लिहिल्याबद्दल जॉन विल्किसला तुरुंगात टाकण्यात आले. लंडनमध्ये दंगे.

१७७४ – लुई सोळावा फ्रांसच्या राजेपदी.

१७७५ – अमेरिकन क्रांति – कर्नल बेनेडिक्ट आर्नोल्ड व इथन ऍलेनच्या सैन्याने फोर्ट टिकॉन्डेरोगा हा किल्ला जिंकला.

१७७५ – अमेरिकन क्रांति – अमेरिकेच्या १३ वसाहतींच्या प्रतिनिधींनी खंडीय सैन्याची उभारणी केली व त्याचे नेतृत्त्व व्हर्जिनीयाच्या कॅव्हेलियर जॉर्ज वॉशिंग्टनकडे दिले.

१७९६ – नेपोलियन बोनापार्टने इटलीत ऑस्ट्रियाच्या सैन्याचा पराभव केला.

१८०१ – ट्रिपोलीच्या बार्बेरी चाच्यांनी अमेरिकेविरुद्ध युद्ध पुकारले.

१८६५ – अमेरिकन गृहयुद्ध – उत्तरेच्या सैन्याने दक्षिणेच्या राष्ट्राध्यक्ष जेफरसन डेव्हिसला पकडले.

१८६९ – अमेरिकेचे दोन्ही किनारे रेल्वेने जोडले गेले. युटाहमधील प्रोमोन्टरी पॉईंट येथे पूर्व आणि पश्चिमेकडून बांधत आलेले लोहमार्ग जोडले गेले.

१८७७ – रोमेनियाने स्वत-ला तुर्कस्तानपासून स्वतंत्र जाहीर केले.

१९२२ – अमेरिकेने किंगमन रीफ हा द्वीपसमूह बळकावला.

१९२४ – जे. एडगर हूवर अमेरिकेच्या एफ.बी.आय.च्या निदेशकपदी. हूवर १९७२ पर्यंत या पदावर होता.

१९३३ – जर्मनीत नाझींनी पुस्तकांची जाहीर होळी केली.

१९४० – दुसरे महायुद्ध – जर्मनीने इंग्लंडच्या पेलहाम गावावर बॉम्बफेक केली.

१९४० – दुसरे महायुद्ध – जर्मनीने बेल्जियम, नेदरलँड व लक्झेम्बर्गवर आक्रमण केले.

१९४० – दुसरे महायुद्ध – नेव्हिल चेम्बरलेनने राजीनामा दिल्यावर विन्स्टन चर्चिन युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानपदी.

१९४१ – दुसरे महायुद्ध – लुफ्तवाफेच्या बॉम्बफेकीत ईंग्लंडचे हाउस ऑफ कॉमन्स नष्ट.

१९६० – अमेरिकेच्या परमाणुचलित पाणबुडी यु.एस.एस. ट्रायटनने पाण्याखालून पृथ्वीप्रदक्षिणा केली.

१९६९ – व्हियेतनाम युद्ध – हॅम्बर्गर हिलची लढाई.

१९७९ – मायक्रोनेशिया प्रजासत्ताक झाले.

१९८१ – फ्रांस्वा मित्तरां फ्रांसचा राष्ट्राध्यक्षपदी.

१९९३ – थायलंडमध्ये खेळण्यांच्या कारखान्यास आग. १८८ ठार.

१९९६ – एव्हरेस्टवर हिमवादळ. चढाई करणारे ८ व्यक्ति ठार.

१९९७ – ईशान्य ईराणमध्ये भूकंप. २,४०० ठार.

२००२ – घानामध्ये फुटबॉलचा सामना सुरु असताना चेंगराचेंगरी. १२० ठार.

राष्ट्रीय

१८५७ – पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्राम सुरू.

२००६ – महाराष्ट्रातील शिक्षण संस्थात ५० टक्के आरक्षण लागू करण्यात आले.

२००७ – भारताचा आक्रमक फलंदाज विरेंद्र सेहवाग एक दिवसीय क्रिकेटमध्ये ५ हजार धावा पुर्ण करणारा सहावा भारतीय फलंदाज बनला.

२००८ – शिवसेनेच्या उत्तर भारतीय भूमिकेला कंटाळून पक्षाला सोडचिठ्ठी दिलेल्या बंडखोर शिवसैनिकांनी 'राष्ट्रवादी शिवसेना' नावाचा पक्ष स्थापन केला.

२००८ – प्रख्यात उद्योगपती रतन टाटा आणि बाबा निळकंठ कल्याणी, बॉलीवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित आणि केंद्र सरकारच्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा. सुखदेव थोरात यांचा राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्याहस्ते पद्मपुरस्कार प्रदान करून त्यांचा सत्कार करण्यात आला. यातील रतन टाटा यांना पद्मविभूषण हा दुसऱ्या सर्वोच्च क्रमांकाचा नागरी सन्मान तर बाबा कल्याणी, माधुरी दीक्षित व प्रा. थोरात यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.

२००८ – चेन्नई सुपर किंग्जचा लक्ष्मीपती बालाजीने आयपीएलच्या ट्वेंटी-२० क्रिकेट सामन्यात किंग्ज इलेव्हन पंजाब विरुद्ध हॅट्रीक घेतली.

जन्म

१२६५ – फुशिमि, जपानी सम्राटाचा जन्म.

१८३८ – जॉन विल्क्स बूथ, अब्राहम लिंकनचा मारेकरीचा जन्म.

१८७८ – गुस्ताव स्ट्रेसमान, जर्मनीचा चान्सेलरचा जन्म.

१८९७ – आयनार गेर्हार्डसन, नॉर्वेचा पंतप्रधानाचा जन्म.

१९२७ – नयनतारा सहगल भारतीय लेखिकाचा जन्म.

१९५५ – मार्क चॅपमन, जॉन लेननचा मारेकरीचा जन्म.

१९५८ – तौसीफ अहमद, पाकिस्तानी क्रिकेटपटूचा जन्म.

१९६० – बोनो, आयरिश गायकाचा जन्म.

निधन

१०३४ – मियेस्झ्को दुसरा, पोलंडचा राजाचे निधन.

१४२४ – गो-कामेयामा, जपानी सम्राटचे निधन.

१४८२ – पाओलो डाल पोझो टोस्कानेली, इटलीचा गणितज्ञ व अंतराळतज्ञाचे निधन.

१७३७ – नाकामिकाडो, जपानी सम्राटचे निधन

१७७४ – लुई पंधरावा, फ्रांसचा राजाचे निधन.

१८६३ – स्टोनवॉल जॅक्सन, अमेरिकन गृहयुद्धातील दक्षिणेचा सेनापतीचे निधन.

२००६ – शेख मोहम्मद इब्न उत्मान अल मुलहेम, भारतातील सौदी अरबचे पहिले राजदूत आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे घनिष्ट मित्र यांचे निधन.

२००८ – सुशीलकुमार, हिंदीचे ज्येष्ठ लेखक व पत्रकार यांचे निधन.

# तुमच्या शरीरात वाढले आहे का युरिक ॲसिड, जाणून घ्या कारण आणि प्रतिबंध करण्याच्या पद्धती



शरीरात युरिक ॲसिड वाढले, तर अनेक आजार होतात. त्यामुळे सांधेदुखी, त्वचा लाल होणे, संधिवाताचा त्रास सुरू होतो. त्यामुळे युरिक ॲसिड नियंत्रित करणे अत्यंत आवश्यक आहे. यावर वेळीच नियंत्रण न ठेवल्यास सांधेदुखीचा त्रास होतो. युरिक ॲसिड म्हणजे काय आणि ते का वाढते, हे आपण प्रथम जाणून घेऊया.

ज्येष्ठ चिकित्सकांच्या मते, जेव्हा मूत्रपिंडाची फिल्टरिंग क्षमता कमी होते, तेव्हा आपल्या हाडांच्या दरम्यानच्या पृष्ठभागावर आम्लाच्या स्वरूपात युरिया जमा होऊ लागतो. त्यामुळे संधिरोगाचा त्रास होतो. त्यामुळे शरीराच्या स्नायूंना सूज येते. त्यामुळे शरीरात वेदना कायम राहतात. ही वेदना मान, गुडघा आणि घोट्यात होते. काही लोकांची त्वचा देखील लाल होऊ लागते. तसेच थकवा येण्याची समस्या देखील असू शकते.

ही चिंतेची बाब आहे की आता वयाच्या ३० ते ४० व्या वर्षीही युरिक ॲसिडचे प्रमाण वाढत आहे. खाण्याच्या चुकीच्या सवयी हे याचे प्रमुख कारण आहे. अशा परिस्थितीत खाण्यापिण्याच्या सवयींकडे लक्ष देण्याची गरज आहे.

का वाढते युरिक ॲसिड अयोग्य आहार वाईट जीवनशैली

मधुमेहाची औषधे घेणे लाल मांस आणि समुद्री मासे जास्त प्रमाणात सेवन खूप व्यायाम करणे कसे नियंत्रित करावे यूरिक ॲसिड यासाठी तुम्हाला तुमच्या आहारात काही बदल करणे आवश्यक आहे. डॉक्टरांच्या मते, यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी फायबरचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे. फायबरसाठी हिरव्या भाज्या, संपूर्ण धान्य आणि ओटसचा तुमच्या आहारात समावेश केला जाऊ शकतो. याशिवाय तुम्ही विनाकारण औषधे घेऊ नका हे महत्त्वाचे आहे. जर डॉक्टरांनी काही दिवसांसाठी औषध लिहून दिले असेल, तर ते फक्त तेवढ्या वेळेसाठी घ्या. योग्य आणि संतुलित खा. लाल मांसाचे जास्त सेवन करू नका.

# बल्ब किंवा ट्यूबलाइट फुटल्यावर का येतो 'भप्प' असा आवाज? मनोरंजक रहस्य जाणून घेण्यासाठी येथे वाचा

घर, ऑफिस आणि मॉल्समध्ये दिवे लावण्यासाठी तुम्ही बल्ब आणि ट्यूबलाइट्स लावलेले पाहिले असतील. अनेक वेळा घरातील बल्ब आणि ट्यूबलाइट बदलताना ते पडल्यामुळे फुटतात आणि त्यातून 'भप्प' असा आवाज येतो. तुम्ही या येणाऱ्या आवाजाचा विचार केला आहे का? शेवटी, बल्ब किंवा ट्यूबलाइटचा स्फोट झाल्यावर असा आवाज का येतो? नसेल तर काही हरकत नाही, आम्ही तुम्हाला या भप्पच्या आवाजाचे रहस्य सर्व काही सांगणार आहोत.

टंगस्टन मेटल फिलामेंटचा वापर बल्ब आणि ट्यूब लाइटमध्ये प्रकाश देण्यासाठी केला जातो. जेव्हा या फिलामेंटमधून वीज वाहते, तेव्हा ती उजळते आणि तुमच्या खोलीतील अंधार दूर करते. हीच गोष्ट बल्ब आणि ट्यूबलाइटचा स्फोट झाल्यावर होणाऱ्या आवाजाशी संबंधित आहे, ज्याबद्दल आम्ही तुम्हाला सविस्तर सांगत आहोत.

बल्ब आणि ट्यूबलाइट्समध्ये फिलामेंटचा वापर सर्वात महत्वाचा आहे, त्याशिवाय आपण बल्ब आणि ट्यूबलाइटमधून प्रकाशाची कल्पना करू शकत नाही. ही दोन्ही उपकरणे बनवण्याचा प्रयत्न सुरू असताना फिलामेंटला पर्याय म्हणून अनेक धातूंचा वापर करण्यात आला, परंतु प्रत्येक वेळी हा प्रयोग अयशस्वी ठरला. शेवटी शास्त्रज्ञांना बल्ब आणि ट्यूबलाइटमध्ये प्रकाश देण्यासाठी टंगस्टन धातू सापडला. जे फिलामेंट बनवण्यासाठी सर्वोत्तम आहे.

बल्ब आणि ट्यूबलाइटचा फिलामेंट टंगस्टन धातूपासून बनलेला असतो. ऑक्सिजनच्या उपस्थितीत ते वीज पार करून जाळले जाऊ शकत नाही. त्यामुळे जेव्हा ते बल्ब आणि ट्यूबलाइट्समध्ये वापरले जातात तेव्हा त्यातून ऑक्सिजन काढून टाकला जातो. त्याऐवजी दुसरा गॅस वापरला जातो. ज्याचा फिलामेंट जाळण्यात मोठा हातभार लागतो. जेव्हा बल्ब किंवा ट्यूबलाइटचा स्फोट होतो, तेव्हा वायू बाहेर पडतो आणि ऑक्सिजनमध्ये मिसळतो, तेव्हा फुसफुसणारा आवाज येतो.

जेव्हा फिलामेंट बल्ब आणि ट्यूबलाइट्समध्ये ठेवले जाते तेव्हा ऑक्सिजन पूर्णपणे काढून टाकला जातो. त्याऐवजी हेलियम, निऑन, नायट्रोजन आणि क्रिप्टॉन या वायूंचा वापर केला जातो. या वायूंमुळे, फिलामेंटमधून वीज जात असताना ती जळत नाही आणि वर्षानुवर्षे प्रकाश देते.

जेव्हा बल्ब आणि ट्यूबलाइटमधून वीज प्रवाहित होते, तेव्हा ते प्रकाश तयार करतात. या काळात उष्णता निर्माण होते आणि त्यामुळे बल्ब आणि ट्यूबलाइट आतून गरम होऊ लागतात. जर बल्ब आणि ट्यूबलाइट्समध्ये जाड काच वापरली गेली, तर ही उष्णता बाहेर पडू शकत नाही, ज्यामुळे बल्ब आणि ट्यूबलाइट आपोआप क्रॅक होतील आणि तुटतील. म्हणूनच बल्ब आणि ट्यूबलाइटमध्ये पातळ काच वापरली जाते, ज्यामुळे उष्णता सहज बाहेर पडते.

# राशिभविष्य १० मे २०२५

मेष: शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम

नौकरीत इच्छेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहेत. कुटुंबात आनंदी वातावरण राहील. नवीन लोकांचा संपर्क फायदेशीर असणार आहे. घाईने निर्णय घेऊ नका.

वृषभ : शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण

जीवनासाथीशी संबंध सुधारतील. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागेल. कामकाजाचे क्षेत्र वाढणार आहे. नौकरांवर विश्वास दाखवू नका.

मिथुन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर

आज आपली कार्यक्षमता वाढणार आहे. वहान सुख मिळेल. कुटुंबातील सदस्याची काळजी घ्या. व्यापारातील योजना फलदायी होतील. आर्थिक उत्पन्न वाढेल.

कर्क :शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण

मुलांच्या संबधातील कामात प्रगती राहील. मान सन्मान यश मिळेल. प्रिय व्यक्तिची भेट होण्याची शक्यता आहे. आपल्या मनासारखे सर्वकाही होईल. आळसाला दूर राखा.

सिंह : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम

विनम्र होऊन कार्य केले तर प्रत्येक कामात यश मिळेल. मनासारखा फायदा होईल. मुलांच्या कामामुळे समाजात प्रतिष्ठा वाढेल. वाद विवादापासून दूर रहा.

कन्या :शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण

नौकरीमधील कुशलतेमुळे फायदा मिळेल. शत्रुच्या कुटनितीपासून सावध रहा. आपल्या व्यसनांवर नियंत्रण राखावे लागणार आहे.

तुळ: शुभ रंग :केसरी, शुभ दिशा: पश्चिम

कौटुंबिक वाद, मतभेद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येणार आहे. व्यावसायिक यशामुळे आनंदी रहाल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. कामकाजाची परिस्थिती फायदेशीर राहील.

वृश्चिक: शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:उत्तर

कामकाजात अडचणी आल्यामुळे आपल्याला चिंता लागणार आहे. आर्थिक स्थिती मध्यम राहील. निष्कारण वाद विवाद करू नका. उत्साह राहणार नाही. नवीन संबंधाच्या बाबतीत जागरूकता दाखवा.

धनु: शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर

योग्य परिश्रम घेतल्याने आपले काम सुरळीत पार पडणार आहे. कौटुंबिक अडचण दूर होईल. जीवनसाथीची साथ मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा.

मकर :शुभ रंग: लाल : शुभ दिशा: पश्चिम

नौकरीमध्ये आधिकारी नाराज राहतील. खूप प्रयत्न केले तरी कामात थोडेच यश मिळेल. कौटुंबिक चिंतेमुळे मन असमाधानी राहील. आर्थिक स्थिती मध्यम राहील.

कुंभ: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण

व्यापारात प्रगतीचे योग आहेत. कलेविषयातील रूची वाढेल. प्रभावशाली व्यक्तिंच्या भेटी होतील. आर्थिक फायदा मिळण्याचे योग आहेत. संयमाने कामे करा.

मीन :शुभ रंग: काळा, शुभ दिशा: दक्षिण

भागीदारी व्यवसायत फायदा होईल. अडचणी दूर होतील. विचारपूर्वक व स्वनिर्णय घेऊन कामे करा. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## कर्नल सोफिया कुरेशी देखील..., ऑपरेशन सिंदूरनंतर चर्चेतील महिला लष्करी अधिकाऱ्याबाबत सर्वोच्च न्यायालयात चर्चा; नेमके काय घडले?



दिल्ली : सुप्रीम कोर्टात शुक्रवारी महिला सैन्य अधिकाऱ्यांच्या कायम स्वरूपी नियुक्ती संदर्भातील याचिकेवर सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान कर्नल सोफिया कुरैशी यांचाही उल्लेख करण्यात आला. एका महिला अधिकाऱ्याच्या वकिलांनी कोर्टात सांगितले की, कर्नल सोफिया कुरैशी यांनाही कायमस्वरूपी नियुक्ती मिळावी यासाठी सुप्रीम कोर्टाचे दरवाजे ठोठावावे लागले होते. महिला अधिकाऱ्यांच्या याचिकेवर सुनावणी करताना कोर्टाने केंद्र सरकारला निर्देश दिले की, ज्या महिला अधिकारी अल्पसेवा आयोग अंतर्गत कार्यरत आहेत आणि ज्यांना कायमस्वरूपी नियुक्ती नाकारण्यात आली आहे, अशा अधिकाऱ्यांना सेवामुक्त करू नये, कारण त्यांनी या निर्णयाला कोर्टात आव्हान दिलेले आहे.

दि. ६ आणि ७ मेच्या रात्री, भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केले आणि पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. लष्कराच्या पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी यांनी विंग कमांडर व्योमिका सिंग यांच्यासमवेत ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली. सध्याच्या परिस्थितीत त्यांचे मनोबल कमी होऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने ऑगस्टमध्ये सुनावणीसाठी ६९ अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या याचिका सूचीबद्ध केल्या आणि पुढील सुनावणीपर्यंत त्यांना सेवेतून मुक्त करू नये असे म्हटले आहे.

याबाबत न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीत आपण त्यांचे मनोबल कमी करू नये. त्या एक प्रतिभावान अधिकारी आहेत. तुम्ही त्यांच्या सेवा इतरत्र कुठेतरी घेऊ शकता. ही वेळ त्यांना सर्वोच्च न्यायालयात जाऊन इकडे तिकडे धाव घेण्यास सांगण्याची नाही, असे त्यांनी म्हटले. तर केंद्राकडून बाजू मांडणाऱ्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी म्हणाल्या की, सशस्त्र दलांना तरुण ठेवण्याच्या धोरणावर आधारित हा एक प्रशासकीय निर्णय आहे. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली की, या महिला अधिकाऱ्यांना सेवामुक्त करण्यात अडथळा आणू नये, कारण भारतीय सैन्यदलाला तरुण अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे आणि दरवर्षी केवळ २५० कर्मचाऱ्यांनाच कायमस्वरूपी नियुक्ती दिली जाते.

कर्नल गीता शर्मा यांच्यावतीने उपस्थित वरिष्ठ विधिज्ञ मेनका गुरुस्वामी यांनी कर्नल सोफिया कुरैशी यांच्या प्रकरणाचा उल्लेख केला. कर्नल सोफिया या त्या दोन महिला अधिकाऱ्यांपैकी एक आहेत, ज्यांनी ७ आणि ८ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भात माध्यमांना माहिती दिली होती. कर्नल सोफिया कुरैशी यांना देखील कायमस्वरूपी नियुक्ती संदर्भात अशाच प्रकारची दिलासा मिळवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागले होते आणि आज त्या देशाचे नाव उज्वल करत आहेत. यावर प्रतिक्रिया देताना खंडपीठाने स्पष्ट केले की, सर्वोच्च न्यायालयासमोर असलेले प्रकरण हे पूर्णपणे कायदेशीर स्वरूपाचे आहे आणि त्याचा संबंधित अधिकाऱ्यांच्या कामगिरीशी काहीही संबंध नाही, असे म्हटले आहे.

दरम्यान, दि. १७ फेब्रुवारी २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, सैन्यातील स्टाफ नियुक्त्यांव्यतिरिक्त इतर सर्व पदांवर महिलांना पूर्णत: वगळणे हा निर्णय समर्थन करण्यासारखा नाही. तसेच, कमांड नियुक्त्यांसाठी महिलांवर कोणत्याही योग्य कारणाशिवाय विचार न करणे हा निर्णय कायद्याच्या चौकटीत बसणारा नाही. न्यायालयाने महिला अधिकाऱ्यांना लष्करात कायमस्वरूपी कमिशन (पीसी) देण्याची परवानगी दिली होती आणि शारीरिक मर्यादा आणि सामाजिक पद्धतींचा हवाला देत त्यांना कमांड मुख्यालयात नियुक्ती देऊ नये हा सरकारचा युक्तिवाद त्रासदायक आणि समानतेच्या तत्त्वाच्या विरुद्ध असल्याचे म्हटले होते. तेव्हा न्यायालयाने म्हटले होते की, भूतकाळात महिला अधिकाऱ्यांनी देशाला गौरव मिळवून दिला आहे आणि सशस्त्र दलांमध्ये लिंग-आधारित भेदभाव संपवण्यासाठी सरकारच्या मानसिकतेत बदल आवश्यक आहे. २०२० च्या या निर्णयानंतर, सर्वोच्च न्यायालयाने सशस्त्र दलांमधील महिला अधिकाऱ्यांच्या कायमस्वरूपी नियुक्तीबाबत अनेक आदेश दिले असून, याचप्रमाणे नौदल, भारतीय वायुदल आणि तटरक्षक दलांबाबतही असेच आदेश पारित करण्यात आले होते.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्र विकासाचा प्रस्ताव सादर करावा – उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकात पाटील

नाशिक : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक येथील उपकेंद्राच्या इमारतीत येत्या जून महिन्यापासून विविध अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन करावे. रस्ते, वीज, पाणी आणि दळण-वळणाच्या सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी पाठपुरावा करतानाच उपकेंद्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकीकृत विकास आराखड्याच्या प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

मंत्री श्री. पाटील यांनी शिवनई शिवारातील उपकेंद्राच्या प्रशासकीय इमारतीला भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार



देवयानी फरांदे, विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे, प्राचार्य डॉ. सुभाष निकम, व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य, डॉ. राजेंद्र विखे पाटील, बागेश्री मंथळकर, देविदास वायदंडे, नितीन घोरपडे, संदीप पालवे, सिनेट सदस्य विजय सोनवणे, प्राचार्य श्री. भांबर, संपत काळे, सचिन गोरडे, बाकेराव बस्ते आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. पाटील म्हणाले की, सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या उपकेंद्र परिसराचा सर्वांगीण विकासाचे नियोजन करावे. त्यासाठी एकत्रित प्रस्ताव सादर करावा. उपकेंद्राच्या कामकाजाचा नियमितपणे आढावा घ्यावा. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री. वैद्य यांनी उपकेंद्राची माहिती देतानाच परिसरात आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

# खाजगी बाजार व थेट बाजारांच्या सुविधांची तपासणी करावी – पणन मंत्री जयकुमार रावल

पुणे : राज्यात शेतकऱ्यांना शेतमाल विक्री साठी कृषी उत्पन्न बाजार समिती व्यतिरिक्त १०५ खाजगी बाजार तसेच थेट बाजार कार्यरत आहेत. काही खाजगी व थेट बाजाराबाबत शेतमाल विक्री सुविधा संदर्भात तक्रारी आहेत. खाजगी बाजारात खरेदी विक्री शेड, बाजार ओटे, गोडावुन, रस्ते यासह पायाभूत सुविधांची तपासणी करण्यात यावी. तसेच त्यांचे खरेदी विक्रीचे सर्व व्यवहार ऑनलाईन करण्या संदर्भात सूचना देण्यात याव्या. परवाना देताना लावून दिलेल्या नियमांचे पालन न करणाऱ्या खाजगी व थेट बाजार यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. व्यवहार पारदर्शक नसलेल्याचे परवाने रद्द करण्याची करण्यात यावी. तसेच सर्व खाजगी व थेट बाजाराचे लेखा परीक्षण करण्यात यावे असे निर्देश राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले. ते पणन संचालनायाच्या बैठकीत बोलत होते.

पणन संचालनायाची आज पुण्यात बैठक झाली. या बैठकीत पणन संचालक विकास रसाळ, उपसंचालक मोहन निंबाळकर, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यासह अधिकारी उपस्थित होते.



पुढे बोलतांना मंत्री श्री रावल म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समिती सह खाजगी व थेट बाजारात शेतकऱ्यांनी विकलेला मालाचे पैसे शेतकऱ्यांना २४ तासाच्या आत ऑनलाइन पद्धतीने किंवा इतर मान्य पद्धतीने देण्यात यावे. प्रत्येक महिन्यात शेतकऱ्यांच्या मालाचे पैसे शेतकऱ्यांना दिले का? यासंदर्भात आढावा घेण्यात यावा. शेतमाल विक्रीचे पैसे अडवून ठेवलेल्या परवानाधारकांवर परवाना रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी. नवीन परवाना देताना किंवा नूतनीकरण करताना जलद गतीने प्रक्रिया करण्यात यावी. तसेच परवाना देताना बँक गॅरंटी घेण्यात यावी. राज्यातील ग्राहक सहकारी संस्था, जिनिंग प्रेसिंग संस्था,फळे व भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था यांना प्रोत्साहन देण्यासाठी काम करावे.

राज्यात मोठ्या क्षेत्रावर फळे आणि भाजीपाला पिकांचे उत्पादन घेतले जाते. राज्यात ४६६ फळे व भाजीपाला उत्पादक सहकारी संस्था नोंदणीकृत असून त्यापैकी ४५३ संस्था कार्यरत आहेत. या संस्थांच्या माध्यमातून उत्पादित फळे आणि भाजीपाला पिकांची साठवणूक करणे ग्रेडिंग पॅकिंग व निर्यात करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने पणन संचालयाने नियोजन करावे. महामँगो, महाग्रेप्स, महाबनाना, महाऑरेंज, महाआनार, अशा संस्थांना त्यांच्या संबंधित कृषी मालाला निर्यात करण्याचे संदर्भात चालना देण्यात यावी. असे मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

शेतकऱ्यांची शेतमाल विक्री हक्काची सनद प्रत्येक बाजार समितीत लावा

शेतकऱ्यांच्या शेतमाल विक्री हक्काची त्यांना माहिती व्हावी,यासाठी शेतकरी हक्काची सनद प्रत्येक बाजार समितीत लावा अशी सूचना पणन मंत्री जयकुमार रावल यांनी अधिकाऱ्यांना केली.

## "ऑपरेशन सिंदूरमधून पाकिस्तानला योग्य उत्तर, असे पाऊल उचलणे.."; मोहन भागवत काय म्हणाले?



दिल्ली : पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यात चार दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली. या हल्ल्याचा निषेध जगाने नोंदवला. त्यानंतर काही कालावधीतच या हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याचं कळलं होतं. ज्यानंतर भारताने ६ आणि ७ मेच्या रात्री ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिलं. पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमधले दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. यानंतर आता या कारवाईचं सरसंघचालक मोहन भागवत यांनी कौतुक केलं आहे.

"ऑपरेशन सिंदूर भारत सरकारच्या नेतृत्वात आणि सैन्य दलांनी उचललेलं महत्त्वाचं पाऊल आहे. जे क्रूर हत्याकांड दहशतवाद्यांनी घडवून आणलं आणि भ्याड हल्ला केला तेव्हापासूनच देशवासियांच्या मनात पीडित कुटुंबांना, माता भगिनींना न्याय मिळावा ही देशभावना होती. ज्यानंतर ही कारवाई करण्यात आली. आम्ही सरकारचं आणि सैन्य दलांचं अभिनंदन करतो."

सरकारने आणि सैन्य दलांनी ऑपरेशन सिंदूर राबवल्याने संपूर्ण देशाची हिंमत वाढली आहे आणि त्यांची छाती अभिमानाने फुलली आहे. पाकिस्तानने जे केलं त्यानंतर भारतीय सैन्य दलांनी दिलेलं उत्तर ही महत्त्वाची आणि अपरिहार्य कारवाई होती. भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष सुरु आहे. अशा संकट काळात आम्ही तन-मन-धनासह देशाच्या सरकारच्या आणि सैन्य दलांच्या पाठिशी आहोत. पाकिस्तानी सैन्याकडून सामान्य नागरिकांचा विचार न करता हल्ले केले जात आहेत. सीमा भाग आणि धार्मिक स्थळं यांना लक्ष्य केलं जातं आहे. या घटनांमध्ये ज्यांना प्राण गमवावा लागला त्यांच्या प्रति आमच्या सहवेदना आहेत. आम्ही त्या कुटुंबांच्या दु:खात सहभागी आहोत. असंही मोहन भागवत यांनी म्हटलं आहे.

सध्या आपण युद्धजन्य स्थितीत आहोत. या आव्हानात्मक परिस्थितीत संघ म्हणून आम्ही देशवासीयांना आवाहन करत आहोत की सरकारने दिलेल्या सूचना आणि निर्देशांचं तंतोतंत पालन करा. तसंच राष्ट्रविरोधी शक्तींच्या विरोधात आपल्याला आपली एकजूट दाखवून देण्याची वेळ आली आहे. प्रत्येक नागरिकाने आपलं कर्तव्य बजावून सरकारतर्फे जे सांगितलं जाईल त्याचं तंतोतंत पालन या काळात करायला हवं आणि सरकारला सहकार्य करायला हवे. देशाची राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षा यासाठी आवश्यक असलेल्या सरकारच्या सगळ्या प्रयत्नांना पाठिंबा दिला पाहिजे. असेही मोहन भागवत यांनी म्हटले आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894